# हिंगणा नगर पंचायत

[नियम क्र.६.१.१.(महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४४ व ६९ आणि महाराष्ट्र नगर परिषद, नगर पंचायती आणि औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ चे कलम १८९ अन्वये)]

---

## बांधकाम परवाना मंजुरी (अधिकृत)

प्रती,

श्री. अमित अमल कर्माकर,

रा. अनंत नगर, नागपूर.

विषय:- बांधकाम परवाना (अधिकृत) मंजुरी देण्याबाबत.

संदर्भ:- आपला अर्ज दि:-०६/०२/२०१६

महोदय,

आपण खालील ठिकाणी महाराष्ट्र नगर परिषद, नगर पंचायती आणि औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ च्या कलम १८९ अन्वये व महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४४/६९ अन्वये विकास कार्य करण्यासाठी बांधकाम परवाना मिळण्यासाठी दिनांक ०६/०२/२०१६ रोजी केलेल्या अर्जास अनुसरुन या खालील व पाठीमागे दिलेल्या शर्ती व अटीस पात्र राहून आणि या सोबतच्या बांधकाम नकाशावर लाल रंगाने दर्शविलेल्या सुधारण्यास पात्र राहून आपणास हे प्रारंभ प्रमाणपत्र म.प्रा.व.न.र. अधिनियम १९६६ चे कलम ४५ नुसार हा बांधकाम परवाना BPA\००३१\२०१६-२०१७ देण्यात येत आहे.

बांधकाम तपशील: निवासी वापरासाठी (२८८७.८११ चौ.मि.), व्यवसायीक वापरासाठी (२४६.५२ चौ.मी.)

### बांधकामाच्या जागेचे वर्णन

| | | | |
|---|---|---|---|
| मौजा / सि.स.न. | :-हिंगणा | त.सा.क्र./स.नं. | :-१४१ |
| गट क्र./भूखंड क्र. | :-०१ ते ०७ | शहर | :-हिंगणा |
| रस्ता/प्रभाग क्र./मोहल्ला | :-हिंगणा सिटी | प्लॉटचे क्षेत्रफळ | :- २,३७६.३१ चौ.मि |
| बांधकामाचे क्षेत्रफळ | :- ३,१३४.३३१चौ.मी. | मजल्याची संख्या | :-०४ |

NAGAR PANCHAYAT HINGNA

खास शर्ती/अटीवर

१. प्रस्तावित इमारतीचे बांधकाम मंजुर नकाशात लाल रंगाने रेखांकित केल्यानुसार असावे.
२. प्लिंथ लेवलचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर बांधकामावर देखरेख करणारे इंजी/आर्के. यांचा तपशील अहवाल सादर करणे आवश्यक राहील.
३. बांधकाम परवानगी करीता सादर केलेले मालकी हक्क व इतर कागदपत्राच्या आधारावर सदर परवानगी देण्यात आली आहे, त्यात काही दोष असल्यास अथवा सदरची कागदपत्रे खोटी व दिशाभुल करणारी असल्यास सदरची परवानगी रद्द समजण्यात येईल, तसेच याबाबत परवानगी धारकास जबाबदार धरुन भं.द.वि. संहितेच्या तरतुदीनुसार फौजदारी कारवाईस पात्र धरण्यात येईल.
४. बांधकाम परवानगी मंजुरी तारखेपासुन १(एक) वर्षाकरीता ग्राह्य राहील. मुदतीचे आत बांधकाम सुरु करणे शक्य नसल्यास मुदतीच्या आत १ महिन्यापूर्वी अर्ज करून मुदतवाढ प्राप्त करता येईल, परंतु अशी मुदतवाढ फक्त दोनच वेळाच मिळू शकेल.
५. बांधकाम साहित्य रस्ते, सार्वजनिक उपयोगाच्या व रहदारीच्या जागेवर ठेवता येणार नाही, तसे केल्यास पूर्व सुचना न देता हटविण्यात येईल किंवा रस्त्यावरील बांधकाम साहित्य जप्त करण्यात येईल व जप्त केलेले साहित्य परत मिळणार नाही.
६. मंजुर नकाशाप्रमाणे बांध काम करणे बंधनकारक आहे. बांधकाम परवानगीचे विपरीत बांधकाम केल्यास केलेले बांधकाम महाराष्ट्र प्रादेशिक नगर अधिनियम १९६६ चे कलम ५२,५३,व५४ अनन्वय बांधकाम अवेध समजुन पाडून टाकण्यात येईल व फौजदारी गुन्हा दाखल करणे, तसेच महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ नुसार दंडात्मक कर आकारणी करण्याची कारवाई करण्यात येईल.
७. आपले प्रस्तावित इमारतीचे सांडपाणी स्वखर्चाने नगरपंचायतीच्या सार्जनिक गटारापर्यंत सोडण्याची जबाबदारी आपली राहील.
८. पाऊस पाणी संचय करीता आवश्यक उपाययोजना(रेनहवेस्तिंग) करणे बंधनकारक आहे. बांधकाम करतेवेळी शेजाऱ्याचे अथवा न.प.मालमत्तेचे नुकसान होणार नाही याची दक्षता घेणे बंधनकारक राहील अन्यथा स्वखर्चाने भरपाई करावी लागेल.
९. बांधकाम करते वेळी कमीत कमी १० वृक्ष लावणे आपणावर बंधनकारक आहे.
१०. बांधकाम हाती घेण्यापुर्वी बांधकाम नकाशा अधिकृत स्ट्रकचरल डीजाइन तयार करवून घ्यावे व त्याची एक प्रत न.प.कार्यालयात सादर करावी.
११. न.प.चे पूर्व मंजुरी शिवाय प्रस्तावित बांधकाम मध्ये फेरफार करता येणार नाही, फेरफार करावयाचे असल्यास सुधारित नकाशा मंजूर करून घेणे बंधनकारक आहे.
१२. ईमारतीचे डिजाइन भारतीय मानक ब्युरो ने भूकंप रोधक बांधकामाचे संदर्भात विहित केलेल्या तरतुदीनुसार असावे, भविष्यात कोणतीही दुर्घटना/ नैसर्गिक आपत्ती आल्यास होणाऱ्या नुकसानीस घरमालक स्व:ता जबाबदार राहील.
१३. महाराष्ट्र आग प्रतिबंध व जीवन संरक्षण उपाययोजना अधिनियम २००६ अनन्वे लागूकरावयाचे उपाययोजना नुसार आवश्यक सोय उभारून आधीनियामातील कलम३(३) कलम ४(१) नुसार प्रमाणपत्र सदर केल्याशिवाय ईमारातीचे भोगवटा/वापर करता येणार नाही.

NAGAR PANCHAYAT HINGNA

१४. नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.टी.पी.बी.-४३१२/यु.आर आर २५९/नवी-११ दिनाक १० जानेवारी २०१२ अनन्वे इमारत व बांधकाम व्यवसायातील कामगार यांचे संदर्भीय कामगार विभागाने निर्गमित केलेले नियम/परिपत्रक/प्रचलित आदेश याची पूर्तता करण्याची सर्वस्वी जवाबदारी घर माळकाची आहे. त्यात अनियीमितता दिसल्यास होणारया घरमालक स्वा:ता जवाबदार राहाल.

१५. मंजूर नाकाशात ईमारतीचा वापर ज्या प्रयोजनासाठी दर्शिविला आहे त्याच प्रयोजनासाठी ईमारतीचा वापर करावा अन्य प्रयोजनासाठी पूर्वे परवानगी शिवाय वापर/बदल केल्यास संपूर्ण बांधकाम महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ चे कलम ५२,५३,५४ नुसार कारवाईस पात्र करण्यात येईल

१६. ____________________

१७. ____________________

येणेप्रमाणे परवाना दिला असे.

बांधकाम परवाना क्र :- BPA\००३१\२०१६-२०१७

दिनाक :- ९३/८/२०१६

NAGAR PANCHAYAT HINGNA

मुख्याधिकारी

हिंगणा नगर पंचायत

i) प्रत माहितीसाठी कर निर्धारण अधिकारी

हिंगणा नगर पंचायत